# म.सं.कौ.हिं.का.अर्ज. क्र. २६/२०२३ मध्ये नि.क्र. १२ वर

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला क्र ३ व ४ यांनी त्यांचे विरुध्द झालेला विना म्हणणे अर्ज चालविण्याचा आदेश रदद करुन सामनेवाला यांचे म्हणणे दाखल करुन घेण्याची संधी द्यावी यासाठी दाखल केला आहे.

२. सामनेवाला क्र ३ व ४ अर्जांतील कथने थोडक्यात अशी आहेत की, सामनेवाला क्रमांक २ हे मागील दीड ते दोन महिन्यापासून आजारी असल्याने व त्यांचे जवळचे नातेवाईक मयत झाल्याने कोर्टात हजर राहून म्हणणे देवू शकले नाहीत अथवा त्याचा विधीज्ञांशी संपर्क झाला नाही. सबब सामनेवाला यांचे विरुध्द पारीत झालेला विना म्हणणे अर्ज चालविण्याचा आदेश रद्द व्हावा अशी विनंती सामनेवाला क्र ३ व ४ यांनी केली आहे.

३. सदर अर्जावर अर्जदार यांनी म्हणणे दाखल करत प्रखर विरोध दर्शविला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, सामनेवाला यांचा अर्ज संपूर्णता खोटा व चुकीच्या मजकूरावर आधाराती आहे. सामनेवाला हे दिनांक १८/१०/२०२३ रोजी विधीज्ञांमार्फत हजर झालेले आहेत. तसेच सामनेवाला यांनी दिलेली अर्जातील कारणे संयुक्तीक नाहीत, प्रतिवादी यांनी आजारपणाबाबत अथवा कोण नातेवाईक मयत झाले याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केला नाही. सबब प्रतिवादी यांचा अर्ज नामंजूर करण्यात यावा. जर अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयापर्यंत मे. न्यायालय आले तर, सामनेवाला यांना जास्तीत जास्त दंड करण्यात यावा. अशी विनंती त्यांनी केली आहे.

४. उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता सामनेवाला क्र ३ व ४ यांचे विरुध्द निशाणी क्र १ कडे दिनांक २०/१२/२०२३ रोजी एकतर्फा अर्ज चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. सबब, सामनेवाला क्र ३ व ४ हे अर्जदार यांचे सदर अर्जावर म्हणणे दाखल करु शकले नाहीत. सामनेवाला क्र ३ व ४ यांचे म्हणणे दाखल करुन तो गुणदोषावर पुर्णतः निकाली करण्यासाठी नैसर्गिक न्यायतत्वाप्रमाणे उभय पक्षांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. सबब सामनेवला क्र ३ व ४ यांचे विरुध्द पारीत झालेला एकतर्फा अर्ज चालविण्याचा आदेश करुन त्यांना म्हणणे देण्याची संधी देणे न्यायहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. परंतू सामनेवाला यांनी म्हणणे देण्यास केलेल्या विलंबासाठी अर्जदार हिस नुकसान भरपाई देखील देणे न्याय होणार आहे. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१. अर्ज नि.क्र. १२ मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र ३ व ४ यांचे विरुध्द दिनांक २०/१२/२०२३ रोजी झालेला विना म्हणणे अर्ज चालविण्याचा आदेश अर्जदार यांना रक्कम रूपये २००/– चा खर्च पुढील तारखेपर्यत देण्याच्या अटीवर रदद करण्यात येतो.

स्वाक्षरीत/–

दिनांक – २४/०१/२०२४ (आय. जी. महादेवकोळी)

२रे सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर,परंडा

## म.सं.कौ.हिं.का.अर्ज. क्र. २६/२०२३ मध्ये नि.क्र. १० वर

## आदेश

प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला क्र १ व २ यांनी त्यांचे विरुध्द झालेला विना म्हणणे अर्ज चालविण्याचा आदेश रदद करुन सामनेवाला यांचे म्हणणे दाखल करुन घेण्याची संधी द्यावी यासाठी दाखल केला आहे.

सामनेवाला क्र १ व २ अर्जांतील कथने थोडक्यात अशी आहेत की, सामनेवाला क्रमांक २ हे मागील दीड ते दोन महिन्यापासून आजारी असल्याने व त्यांचे जवळचे नातेवाईक मयत झाल्याने कोर्टात हजर राहून म्हणणे देवू शकले नाहीत अथवा त्याचा विधीज्ञांशी संपर्क झाला नाही. सबब सामनेवाला यांचे विरुध्द पारीत झालेला विना म्हणणे अर्ज चालविण्याचा आदेश रद्द व्हावा अशी विनंती सामनेवाला क्र १ व २ यांनी केली आहे.

सदर अर्जावर अर्जदार यांनी म्हणणे दाखल करत प्रखर विरोध दर्शविला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, सामनेवाला यांचा अर्ज संपूर्णता खोटा व चुकीच्या मजकूरावर आधाराती आहे. सामनेवाला हे दिनांक १८/१०/२०२३ रोजी विधीज्ञांमार्फत हजर झालेले आहेत. तसेच सामनेवाला यांनी दिलेली अर्जातील कारणे संयुक्तीक नाहीत, प्रतिवादी यांनी आजारपणाबाबत अथवा कोण नातेवाईक मयत झाले याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केला नाही. सबब प्रतिवादी यांचा अर्ज नामंजूर करण्यात यावा. जर अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयापर्यंत मे. न्यायालय आले तर, सामनेवाला यांना जास्तीत जास्त दंड करण्यात यावा. अशी विनंती त्यांनी केली आहे.

उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता सामनेवाला क्र १ व २ यांचे विरुध्द निशाणी क्र १ कडे दिनांक २०/१२/२०२३ रोजी विना म्हणणे अर्ज चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. सदर अर्जावर सामनेवाला यांचे म्हणणे दाखल करुन तो गुणदोषावर पुर्णतः निकाली करण्यासाठी नैसर्गिक न्यायतत्वाप्रमाणे उभय पक्षांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. सबब सामनेवला क्र १ व २ यांचे विरुध्द पारीत झालेला विना म्हणणे अर्ज चालविण्याचा आदेश रद्द करुन त्यांना म्हणणे देण्याची संधी देणे न्यायहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. परंतू सामनेवाला यांनी म्हणणे देण्यास केलेल्या विलंबासाठी अर्जदार हिस नुकसान भरपाई देखील देणे न्याय होणार आहे. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१. अर्ज नि.क्र. १० मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र १ व २ यांचे विरुध्द दिनांक २०/१२/२०२३ रोजी झालेला विना म्हणणे अर्ज चालविण्याचा आदेश अर्जदार यांना रक्कम रूपये २००/– चा खर्च पुढील तारखेपर्यत देण्याच्या अटीवर रदद करण्यात येतो.

स्वाक्षरीत/–

दिनांक – २४/०१/२०२४

(आय. जी. महादेवकोळी)

२रे सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर,परंडा

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | *Shri. Suresh Bapu Bhingare* |
| Name of Court | Shri. I.G.Mahadeokoli, 2nd Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Paranda |
| Date of Dictation | 2 4/01/2024. |
| Judgment signed by the P.O. on | 24/01/2024. |
| Judgment/Order uploaded on | 24/01/2024. |